आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१ ऑगस्ट २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- पेपरफुटी प्रकरणी कठोर कारवाईची तरतूद असणारा कायदा देशभरात लागू

- कॉकरोच जनता पार्टीसह इतर संघटनांना मिळत असलेल्या परदेशी निधीच्या उपयोगाची ईडी आणि महाराष्ट्र सरकारकडून चौकशी

- करांचा अग्रीम हिस्सा म्हणून केंद्राकडून राज्याला ७ हजार कोटी, पूर नियंत्रणासाठीही ५०० कोटी रुपये अग्रीम

**आणि**

- जैस्मीन लंबोरिया, प्रीती पवार आणि सोमन राणा यांना आज राष्ट्रकूल स्पर्धेत सुवर्ण पदक

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 'सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक सुधारणा विधेयका'वर स्वाक्षरी केली आहे. स्पर्धात्मक परीक्षांमधे गैरप्रकार रोखून परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणणं हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या नवीन कायद्यात दोषींना १० वर्षांपर्यंतची कैद, १० कोटी रुपयांपर्यंतचा दंड आणि मालमत्ता जप्ती यांसारख्या कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशात विशेष जलदगती न्यायालयं स्थापन केली जातील. पोलिसांना एफआयआर नोंदवल्यापासून दोन महिन्यांत तपास पूर्ण करावा लागेल, तर आरोपपत्र दाखल झाल्यापासून तीन महिन्यांत खटल्याचा निकाल देणं बंधनकारक असेल.

<><><><><>

कॉकरोच जनता पार्टीसह इतर संघटनांना परदेशातून मिळत असलेल्या निधीची चौकशी राज्य सरकारनं सुरू केली आहे. या निधीचा वापर कशासाठी होतोय हे तपासलं जात असल्याचं गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज वार्ताहरांशी बोलताना दिली. केंद्र सरकारकडून ईडी याची चौकशी करत आहे. चुकीच्या गोष्टींसाठी या निधीचा वापर होत असेल तर कारवाई केली जाईल, असंही ते म्हणाले.

**- होल्ड -पंकज भोयर बाइट - - -**

**<><><><><>**

देशातील युवकांनी विज्ञान, तंत्रज्ञान आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं कौतुक केलं आहे. म्हैसुर इथं स्वामी विवेकानंद सांस्कृतिक युवा केंद्र विवेक स्मारकचं उद्घाटन केल्यानंतर झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. युवकांना योग्य संधी आणि दिशा मिळाल्यास त्यांची क्षमता राष्ट्राच्या प्रगतीची प्रेरक शक्ती बनते, असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला.

**- - प्रधानमंत्री बाईट - -**

युवकांच्या सामर्थ्यामुळे भारताने सेमीकंडक्टर उत्पादन, नवोन्मेष आणि खासगी क्षेत्रातील अंतराळ मोहिमांमध्येही मोठी झेप घेतल्याकडे प्रधानमंत्र्यांनी लक्ष वेधलं.

या कार्यक्रमाला कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, तसंच रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी गौतमानंदजी महाराज उपस्थित होते.

**<><><><><>**

आंध्रप्रदेशात भोगापुरम इथं अल्लुरी सीताराम राजू आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. नागरी हवाई वाहतूक मंत्री किंजारिपु राममोहन नायडू, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन कल्याण आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

५ हजार कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या विमानतळावरुन येत्या १७ ऑगस्टपासून विमानवाहतूक सुरु होईल.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १८ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि पायाभरणी या कार्यक्रमात झाली.

**<><><><><>**

कर वितरणाचा अतिरिक्त अग्रीम हप्ता म्हणून केंद्र सरकारनं राज्यांना १ लाख ९ हजार कोटी रुपयांचे वितरण केले आहे. त्यात महाराष्ट्राच्या वाट्याला ७ हजार २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी प्राप्त झाला आहे. १० ऑगस्ट रोजी होणाऱ्या नियमित मासिक कर हस्तांतरणाव्यतिरिक्त ही रक्कम आहे.

पूर निवारणाच्या उपाययोजनांकरता केंद्रानं विविध राज्यांना २ हजार ११७ कोटी रुपये दिले आहेत. त्यात महाराष्ट्राला ५०० कोटी रुपयांचा निधी अग्रीम पहिला हप्ता म्हणून मिळणार आहे.

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे बांधकाम साहित्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे विकासकांना प्रकल्प पुर्ततेसाठी चार महिन्यांची मुदतवाढ देण्याच्या सुचना केंद्र सरकारने सर्व राज्यातल्या रेरा, अर्थात रिअल इस्टेट नियामक प्राधिकरणांना केल्या आहेत. केंद्र सरकारच्या या निर्णयाचं बांधकाम क्षेत्रातल्या संघटना, क्रेडाई आणि नारेडको यांनी स्वागत केलं आहे. देशातल्या सर्व राज्य रिअल इस्टेट नियामक प्राधिकरणांनी या निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी विनंतीही या संघटनांनी केली आहे.

**<><><><>**

देशासमोर आजही अंतर्गत आणि बाह्य स्वरूपाची अनेक आव्हानं आहेत. त्यामुळं सर्वांनी एकजुटीने राष्ट्रसेवेसाठी योगदान द्यावं, असं आवाहन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी आज पुण्यात केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारल्यानंतर ते बोलत होते. एक लाख रुपये, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ मनाप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य नसून, राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची जबाबदारी असल्याचं ते यावेळी म्हणाले.

- **- होल्ड - अजित डोवाल - - -**

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सक्षम आणि अभेद्य बनवण्यात अजित डोभाल यांचं योगदान अत्यंत मोलाचं आहे. अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांच्या अंमलबजावणीत डोभाल यांनी प्रभावी भूमिका बजावल्यानं भारताची सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट झाल्याचे गौरवोद्गार अमित शहा यांनी यावेळी काढले.

**- - होल्ड - अमित शहा - - -**

**<><><><>**

कुठल्याही लेखकाला आपल्या देशातून हद्दपार व्हावं लागू नये, हे आपलं स्वप्न आहे, असं प्रतिपादन लेखिका तस्लीमा नसरीन यांनी आज केलं. कोलकाता इथं झालेल्या सत्कार

समारंभात त्या बोलत होत्या. १९ वर्षांनंतर तस्लीमा नसरीन यांचं काल कोलकात्यात आगमन झालं. कोणत्याही राजकीय पक्षाच्या बाजूने किंवा विरोधात बोलण्यासाठी नाही, तर महिलांच्या अधिकारांसाठी बोलायला आपण आलो आहोत, असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

<><><><>

भारतात राहणाऱ्या एखाद्या परदेशी नागरिकाच्या मूळ देशानं त्याचं राष्ट्रीयत्व निश्चित करुन त्याला स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याशिवाय त्याला देशाबाहेर पाठवता येणार नाही, असं निवेदन केंद्र सरकारनं आज सर्वोच्च न्यायालयाला दिलं. आसाममध्ये परदेशी म्हणून घोषित केलेल्या नागरिकांना मायदेशी परत पाठवण्याची कोणतीही शक्यता नसतानाही अनिश्चित काळासाठी स्थानबद्ध करुन ठेवल्याप्रकरणी दाखल केलेल्या आव्हान याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली, त्यावेळी केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्रात आपलं म्हणणं मांडलं. संबंधित व्यक्तीला हद्दपार करण्यापूर्वी त्याच्या राष्ट्रीयत्वाची पडताळणी करून त्या देशाच्या दूतावासाकडून किंवा उच्चायुक्तालयाकडून आवश्यक दस्तऐवज मिळवणं गरजेचं आहे, असं यात म्हटलं आहे.

<><><><>

सिक्कीम मधल्या नथु ला पास मार्गानं होणाऱ्या भारत आणि चीन यांच्यातल्या व्यापाराला आज सुमारे सहा वर्षांनंतर पुन्हा सुरुवात झाली. दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संबंधासाठी हे एक सकारात्मक चिन्ह आहे. १९६२ मध्ये झालेल्या युद्धानंतर थांबलेला व्यापार २००२ मध्ये पुन्हा सुरु झाला होता मात्र २०२० मधल्या कोविड महामारीमुळे त्याला खीळ बसली होती. नथू ला खिंडीतील सीमापार व्यापारासाठीचे विद्यमान नियम, मंजूर वस्तूंची यादी आणि दैनंदिन व्यापार मर्यादा पूर्वीप्रमाणेच कायम राहतील .

<><><><>

ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत आज भारतीय खेळाडूंनी ३ सुवर्ण पदकं पटकावली. प्रीती पवार हिनं बॉक्सिंगमध्ये महिलांच्या ५४ किलो वजनी गटात तर विद्यमान विश्वविजेती बॉक्सर जैस्मीन लंबोरिया हिनं ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळवलं. गोळाफेकीत दिव्यांग खेळाडू सोमन राणा यानं सुवर्ण आणि शुभम जुयाल यानं रौप्यपदक पटकावलं. पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात बॉक्सर जदुमनी सिंह यानं रौप्यपदकावर नाव कोरलं. तिहेरी उडी स्पर्धेत प्रवीण चित्रवेलनं रौप्य तर सेल्व प्रभू यानं कांस्यपदक जिंकलं.

स्पर्धेच्या पदकतालिकेत भारत सध्या ८ सुवर्ण, १५ रौप्य आणि ७ कास्यपदकांसह एकंदर ३० पदकं मिळवून 6 व्या स्थानी आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांच्यासह इतरांनी पदकविजेत्यांचं अभिनंदन केलं आहे.

//<><><><><>//